Tarun Bharat 11/03/2021

# चिपळूण नागा लेडीज हॉस्टेलला 'मुकुल माधव' देणार किराणा



चिपळूण: नागा लेडीज हॉस्टेलच्या मुलींसमवेत कंपनीचे अधिकारी.

प्रतिनिधी
रत्नागिरी

चिपळूण तालुक्यात रेणुका माता नागा लेडीज वसतिगृह असून राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती हा प्रकल्प चालवत आहेत.मुकुल माधव फौंडेशन व फिनोलेक्स कंपनी यांच्याकडून या प्रकल्पांतर्गत मणिपूर आणि नागालँडमधील १८ मुलीसाठीचा किराणा खर्च उचलला असून चिपळूण येथे रेणुका माता नागा वसतिगृहात हा कार्यक्रम झाला.

भारताच्या ईशान्येकडील भागातील मुलीना चिपळूण येथे आणून त्यांना या प्रकल्पांतर्गत शिक्षण, वसतिगृह,भोजन यांची सोय केली जाते. याचा उद्देश त्या भागातील धर्मांतर,स्थानिक संस्कृती आणि आदिवासींच्या कलांच्या संरक्षणासाठी स्थापन करण्यात आला आहे. याचाच एक भाग म्हणून या कायक्रमाचे उद्घाटन दि. ९ मार्च २०२१ रोजी नगराध्यक्ष श्रीमती, सुरेखा खेराडे आणि तालुका आरोग्य अधिकारी डॉ. ज्योती यादव यांच्या हस्ते झाले. महिला सप्ताह उत्सवाचा एक भाग म्हणून या प्रकल्पाचे उद्घाटन करण्यात आले होते.

तसेच श्री. मंदार लेले, सचिव आणि श्रीमती प्राजक्ता ओक समन्वयक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि राष्ट्रीय सेविका समितीच्या स्वयंसेवक, श्रीमती गोखले, नगरसेविका चिपळूण आणि नागालँड व मणिपूर येथील विद्यार्थिनी या कार्यक्रमास उपस्थित होत्या. या प्रकल्पामुळे नागालँड आणि मणिपूरमधील १८ मुलींना त्यांच्या रोजच्या आहारातील गरजा भागविल्या जातील.

SCS/VP EDIT-8/IND